# निशाणी क्र. ६२ खालील आदेश

अर्जदारांनी प्रस्तुत अर्ज वादी नं. १ यशवंत तात्याबा ढवळे यांच्या वारसांतर्फे कायदेशिर वारस पटलावर घेण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. अर्ज व त्यावर प्रतिवादींनी दाखल केलेले म्हणणे वाचले.

३. अर्जदारांतर्फे विद्वान वकील श्री.एन.एल.बोरा व प्रतिवादीतर्फे एम. एन. नागगोजे यांचा युक्तीवाद श्रवण केला.

४. अर्जदारांनी प्रस्तुत अर्ज मयत वादी क्र.१ चे कायदेशिर वारस म्हणून त्यांना पटलावर घेण्यासाठी दाखल केलेला आहे. अभिलेखाचे अवलोकन कले असता, वादी हा दिनांक २९.०८.२०२३ रोजी मयत झालेला असून, प्रस्तुत अर्ज अर्जदारांनी विहीत मुदतीमध्ये दाखल केला असल्याचे दिसून येते. प्रतिवादींनी प्रस्तुत अर्ज मंजुर करण्यास हरकत घेतलेली नाही. तथापी, न्यायाच्या दृष्टीने दावा पुढे चालविण्यासाठी अर्जदारांना वादीचे कायदेशिर वारस म्हणून समाविष्ट करणे आवश्यक आहे. सदर अर्ज मंजुर न केल्यास अर्जदारांचे अपरिमित नुकसान होणार आहे. याउलट, प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे, दाव्याचा गुणदोषावर निकाल लागण्यासाठी वादीने मागणी केल्याप्रमाणे त्यांना दाव्यात दुरुस्ती करण्याची परवानगी देवुन अर्जदारांना वादीचे वारस म्हणून पटलावर घेणे न्यायाच्या दृष्टीने योग्य व उचित होईल करिता, खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

०१. अर्ज निशाणी क्र.६२ हा मंजूर करण्यात येतो.

०२. अर्जदारांना निर्देशीत करण्यात येते की, प्रस्तुत

आदेशाच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या आत अर्जात नमूद केल्याप्रमाणे मुळ दाव्यात आवश्यक दुरूस्ती करून मयत वादीचे वारस म्हणून १ अ. सुलोचना यशवंत ढवळे,१ब. दत्तात्रय यशवंत ढवळे,१क. मंगल शंकर पुराणे, १ड. सुशीला भाऊसाहेब आधुरे,१इ. सुरेश यशवंत ढवळे, १अ. ते १क. व १.इ. रा. हाळगाव, ता.जामखेड, जि. अहमदनगर, १ड. रा. पिंपरखेड, ता. जामखेड, जि. अहमदनगर यांचा समावेश करण्यात यावा.

स्वाक्षरी/–

दिनांकः– २०/०२/२०२४

(व्ही. व्ही. जोशी)
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ
जामखेड.